महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

तात्काळ व कालमर्यादित : जा.क्र.: विकाऔ/ITCell/२०२०/ 1097
दिनांक : 8 JUL 2020

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाच्या अंतर्गत असलेले सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : **MahaDBT** पोर्टलवर संस्थेच्या login मधील प्रलंबित अर्जांचा त्वरित निपटारा करण्यासाठी वाढीव मुदतीबाबत

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक कर. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७, दि. २०-०५-२०२०.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता तंत्रशिक्षण संचालानालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांकरिता **MahaDBT** पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या प्रलंबित अर्जांची तपासणी करण्याकरिता देण्यात आलेल्या अंतिम मुदतीबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे संदर्भीय परिपत्रकानुसार आपणास या पूर्वीच कळविण्यात आलेले होते. तरी देखील असे निदर्शनास आले आहे की अजूनही बऱ्याच संस्थांच्या login मध्ये विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.

तरी याद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, **MahaDBT** पोर्टलवर आपल्या संस्थेच्या login मधील प्रलंबित असलेले विद्यार्थ्यांचे वैध अर्ज सर्व कागदपत्रांसह तपासणी करून पुढे मंजुरीस्तव पाठविण्याकरिता तसेच वैध नसलेले अर्ज नामंजूर करण्याकरिता आपणास दि. १७-०७-२०२० रोजी पर्यंत अंतिम मुदत देण्यात आलेली आहे.

अंतिम दिनांकानंतर आपल्या संस्थेच्या login मध्ये एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही याची आपण व्यक्तीशः खात्री करावी. तसेच राहिलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत व असे अर्ज अपोआपच सिस्टीम मधून रद्द होतील. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी व आपल्या संस्थेतील विद्यार्थी सदरील शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत याची काळजी घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४८६
ई-मेल : desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ - ई-मेलद्वारे / स्पीड पोस्टद्वारे**

क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७
दिनांक : २०/०५/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : **महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत ......**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५७० दि.२३/१२/२०१९
२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९ दि.२८/०२/२०२०

महोदय,

**आपले सरकार डी.बी.टी.पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टलवरील** उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांच्या लॉगीनमध्ये योजनांसाठीचे विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले अर्ज तपासणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या मुदतवाढीच्या कालावधीमध्ये प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते तसेच " **विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी.**" असेही कळविण्यात आलेले होते. तरीदेखील काही विद्यार्थ्यांचे अर्ज मुदतीमध्ये तपासणी न केल्याने संस्थांस्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबतचा पोर्टलवरील विभागनिहाय अहवाल सोबत जोडला आहे. तरी शासनाने प्रलंबित अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्यासाठी सोबत जोडलेल्या महाडीबीटी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार संस्थांसाठी **दि.२६/०५/२०२० पूर्वी** व कार्यालयांसाठी **दि.३१ /०५/२०२० पूर्वी** निकाली काढण्याबाबत सूचित केले आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना या पत्राद्वारे सुचित करण्यात येतें की, आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व संस्थांना, संस्थांच्या लॉगीन आयडी अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज तसेच Sent Back ( Revert **झालेले ) अंतर्गत** असलेल्या अर्जांची त्रुटी दूर करुन अंतिम दिनांकापूर्वी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्याबाबत सूचित करावे. तसेच, सर्व विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीन आयडीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी **दि.२८/०५/२०२० पूर्वी** करुन निकाली काढावेत.

तसेच विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये Sent Back **अंतर्गत** व **तपासणीसाठी** प्रलंबित असलेले अर्ज अंतिम तारखेनंतर सिस्टिमद्वारे Automatic नामंजूर करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील आणि यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला,

( डॉ. अभय वाघ.)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

सोबत - वरीलप्रमाणे .

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,पाचवा मजला,मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई : ३२.

MahaOnline Workflow

dbtworkflow.mahaonline.gov.in

Apps | Bookmarks | BAMU Results | DTE InsttSearch | DTE Login | cPanel Login | MahaDBT Login | eSMS Service

artment, Please be informed that MahaDBT Portal scrutiny for new A.Y 2019-20 will star

## Notice

IMP Notice for All Departments & Institutes A.Y 2019-20.

- Institute Scrutiny for Merit Schemes is from 19th May 2020 to 17th July 2020.
- Department Scrutiny for Merit Schemes is from 19th May 2020 to 23rd July 2020.
- Institute Scrutiny for Other schemes - 1st Installment is from 19th May 2020 to 17th July 2020.
- Department Scrutiny for Other Schemes - 1st Installment is from 19th May 2020 to 23rd July 2020.

Application

sbursement

The Government of Mahara ... pply for benefit from Schemes of various depart ... cation', 'Directorate of Technical Education', 'Scho ... ', etc. This benefit is received directly into the A

Step 1 Online Applic

Step 2 Scrutiny- The

Step 3 Allotment - A

Step 4 Disbursement

## Important Dates

Close x

| Event | Date |
|---|---|
| Institute Profile Update and Approval by FRA/ SSS/ Dept. before | 2020 January 15 |
| Institute Scrutiny for Merit Schemes before | 2020 July 17 |
| Department Scrutiny for Merit Schemes before | 2020 July 23 |
| Institute Scrutiny for Other schemes - 1st Installment before | 2020 July 17 |
| Department Scrutiny for Other Schemes - 1st Installment before | 2020 July 23 |

## Login

Enter Username

EZKDK Try another

Enter the text you see above:

Login

Forgot Password?

© 2018 MahaOnline. All Rights Reserved. (A)

Powered by MahaOnline

ENG 11:58 08-07-2020